Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

क्र.मबावि/ एबाविसेयो/का-२/४४९१ /२०१०
आयुक्तालय,महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ ( कॅम्प रायगड भवन,
सी.बी.डी.बेलापूर,नवी मुंबई-४०० ६१४.)
दिनांक :- २७/८/२०१०

प्रति,

१) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
जिल्हा परिषद--------------जिल्हा-------------(सर्व)

२) बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी)----------------------(सर्व)

३) बाल विकास प्रकल्प अधिकारी
(ग्रामीण / आदिवासी)------------- सर्व

विषय :- श्रेणी ३ व ४ च्या बालकांना लागू असणारे अतिरिक्त आहाराचे प्रमाण व दर WHO च्या नवीन ग्रोथ स्टँडर्ड प्रमाणे गंभीर (तीव्र) कमी वजनाच्या (Severely Underweight) बालकांना लागू करणेबाबत.

संदर्भ :- १) केंद्र शासनाचे पत्र क्र. F NO-७-५/२०१०-CD-II Dated ०५-०८-२०१०
२) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग यांचे पत्र क्र. एबावि-२००९ /प्र.क्र. १६२/का-५ दि. ११/८/२०१०

वरील विषयी आपणास अवगत करण्यात येते की, पोषण श्रेणी (Nutritional Status) मध्ये मोठया प्रमाणावर बदल करण्यात आले असून जागतिक आरोग्य संघटनेकडून (WHO) शिफारस करण्यात आलेले New Growth Standards स्विकारण्यात आलेले आहेत. यानुसार पूर्वी पोषण दर्जाच्या असलेल्या पाच श्रेणी संपूष्टात येऊन केवळ खालील तिन श्रेणीमध्ये बालकांचा पोषण दर्जा निश्चित करावयाचा आहे.

१) साधारण वजनाची बालके (Normal Children)

२) मध्यम कमी वजनाची बालके (Moderately Underweight)

३) गभीर (तिव्र) कमी वजनाची बालके (Severely Underweight)

उपरोक्त नविन पोषण दर्जाची प्रणाली माहे जून-२०१० या महिन्यापासून महाराष्ट्रातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत स्विकारण्यात आलेली आहेत. त्याप्रमाणे माहे जून २०१० चे मासिक प्रगती अहवालात या श्रेणीप्रमाणे पोषण दर्जाची आकडेवारीही आपल्याकडून नमुद करण्यात आलेली आहे.

या नवीन प्रणालीमुळे अंगणवाडी केंद्रातील जुनी वृध्दीपत्रके (Growth Chart) कालबाहय झालेली आहेत, याची प्रथम नोंद घेण्यात यावी. राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्राना WHO च्या नवीन निकषाप्रमाणे निर्धारित केलेली मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र वृध्दीपत्रके पुरविण्यात आलेली आहेत. वृध्दीपत्रकात बालकांची वजने घेतल्यानंतर नोंद घेण्याचे वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले आहे. माहे मार्च-२०१० च्या लोकस्वास्थ्य मासिकातही याबाबतचा संदेश प्रसिध्द करण्यात आलेला होता.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

सद्यस्थितीत पुरविण्यात आलेल्या वृध्दीपत्रकात ०-५ वर्षे वयोगटातील बालकांच्या नोंदी घ्यावयाच्या आहेत. ५ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची पोषण श्रेणी निश्चित करणेबाबतची कार्यवाही स्वतंत्ररित्या करण्यात येईल.

पोषण श्रेणीनुसार श्रेणी ३ व ४ च्या अतिकुपोषित बालकांना अतिरिक्त आहार देण्यात येत होता. नविन पोषण श्रेणी प्रणाली प्रमाणे गंभिर (तिव्र) कमी वजनाच्या (Severely Underweight) ०-५ वर्षे वयोगटातील बालकांना अतिरिक्त आहार द्यावयाचा आहे. आता श्रेणी-३ व श्रेणी-४ ही प्रणाली संपुष्टात आल्याची जाणीव सर्व अंगणवाडी सेविकांना करुन देण्यात यावी. सद्यस्थितीत ५-६ वर्षे वयोगटातील बालकांची पोषण श्रेणी निश्चित होत नसल्यामुळे या वयोगटातील बालकांना अतिरिक्त आहार देता येऊ शकणार नाही याचीही नोंद घेण्यात यावी.

आपणास कळविण्यात येते की, WHO च्या नवीन निकषाप्रमाणे व वजनाप्रमाणे वृध्दीपत्रकात प्रत्यक्षात बालकाची जी श्रेणी निश्चित होते त्यात कोणताही बदल करण्यात येऊ नये. या प्रणालीमुळे गंभिर (तिव्र) कमी वजनाच्या बालकांची आकडेवारी मोठया प्रमाणात असेल यामुळे कोणतिही भिती बाळगण्याचे कारण नाही, अशा भितीमुळे खोटी आकडेवारी दाखवून खरी आकडेवारी लपविण्यात येऊ नये. याबाबत सर्व सेविकांना सुचना देऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात यावे. जुन्या पध्दतीप्रमाणे पाच श्रेणीमुळे आता केवळ तिन श्रेणींमध्येच बालकांचे वर्गीकरण होत असल्यामुळे यात मोठयाप्रमाणावर बदल होणार आहे.

केंद्र शासनाच्या संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार शासन निर्णय क्र. एबावि २००८/प्रक्र५९/ का ५/ मुंबई दिनांक २४/८/२००९ अन्वये ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील अति तीव्र कमी वजनाच्या (श्रेणी ३ व ४) बालकांसाठी रु ६.०० प्रति दिन प्रति लाभार्थी दर मंजुर असल्याने सदर दर हा ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील गंभिर (तिव्र) कमी वजनाच्या (Severely Underweight) बालकांसाठी लागू करण्यात येत आहे. तसेच नवसंजीवन क्षेत्रातील ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील अति तीव्र कमी वजनाच्या (श्रेणी ३ व ४) बालकांसाठी रु ८.०० प्रति दिन प्रति लाभार्थी दर मंजुर असल्याने सदर दर हा ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील गंभिर (तिव्र) कमी वजनाच्या (Severely Underweight) बालकांसाठी लागू करण्यात येत आहे..

वरीलप्रमाणे काटेकोरपणे अंमजबजावणी करण्यात येऊन याविषयी मुख्यसेविका व अंगणवाडी सेंविकांच्या कामकाजाचा वारंवार आढावा घेण्यात यावा.

आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे-१